स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY**

**NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.**

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade




# ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION


**Phone: (02462) 229542**
**Fax : (02462) 229574**

**Website: www.srtmun.ac.in** **E-mail: bos.srtmun@gmail.com**


## :: परिपत्रक ::

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांतील औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखेंतर्गत बी. फार्म जुना अभ्यासक्रमतील विद्यार्थ्यारिता शैक्षणिक वर्ष २०१६–१७ करिता तात्पुरत्या प्रवेशाबाबत **(Provisional Admission)** नियमावली लागू केली आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

सदरील परिपत्रक व नियमावली प्रस्तुत विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी, सर्व संबंधितानी याची नोंद घ्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर, )(
विष्णुपुरी, नांदेड. )(
जा.क्र.: शैक्षणिक/०१/औषधनिर्माणशात्र/ता. प्र )(
२०१६–१७/१२९८ )(
दिनांक : २२.०९.२०१६. )(

स्वाक्षरित/–
**संचालक**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव,
१) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. परीक्षा नियंत्रक यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३) मा. प्राचार्य, संलग्नित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, नांदेड, परभणी, लातुर, हिंगोली.
५) मा. प्रकल्प आधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट. जि. नांदेड.
६) उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
७) साहाय्यक कुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
८) सिस्टम एक्स्पर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपुरी, नांदेड.
## औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखेच्या वार्षिक पद्धतीच्या विद्यार्थ्यांना (बी फार्म जुना अभ्यासक्रमासाठी) तात्पुरता प्रवेशा देण्याबाबत. (फक्त शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी)
## संदर्भ : परिपत्रक. क्र.२०१६-१७/१२९८. दि:२२/०९/२०१६

*१) औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखेतील जे परीक्षार्थी प्रथम व द्वितीय वर्ष असे दोन्ही वर्षांच्या विषयांपैकी २५ टक्के विषयांमध्ये अनुत्तीर्ण असतील, तर ते तृतीय वर्षात तात्पुरता प्रवेश घेण्यास पात्र राहतील.

*२) औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखेतील जे परीक्षार्थी द्वितीय व तृतीय वर्षाचे एकूण विषयांपैकी २५ टक्के विषयात अनुत्तीर्ण असतील, अंतिम तात्पुरता प्रवेश घेण्यास पात्र राहतील.

३) जे परीक्षार्थी प्रथम व द्वितीय वर्षात अनुत्तीर्ण असून, तृतीय वर्षात किंवा द्वितीय आणि तृतीय वर्षात अनुत्तीर्ण असून, अंतिम वर्षात वरील मुद्दा क्र. १ व २ प्रमाणे प्रवेशित होतील, त्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष/द्वितीय वर्षातील किंवा द्वितीय वर्ष/तृतीय वर्षातील बॅक राहिलेले विषय उन्हाळी—२०१६ च्या पुनर्मूल्यांकनामध्ये उत्तीर्ण झाल्यास अशा विद्यार्थ्यांचा तात्पुरता प्रवेश कायम करून ते उन्हाळी—२०१६ मध्ये तृतीय किंवा अंतिम वर्षाची परीक्षा देण्यास पात्र असतील.

४) जर तात्पुरते प्रवेशित विद्यार्थी उन्हाळी—२०१६ च्या पुनर्मूल्यांकनामध्ये उत्तीर्ण झाले नाहीत, तर अशा विद्यार्थ्यांनी हिवाळी—२०१६ च्या परीक्षेमध्ये बॅक राहिलेले विषय उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल व त्यांना उन्हाळी—२०१७ मध्ये होणाऱ्या परीक्षेत द्वितीय व तृतीय किंवा तृतीय व अंतिम वर्षाची एकत्रित परीक्षा देण्याची परवानगी देण्यात येईल (वरील मुद्दा क्र. १ व २ प्रमाणे). तथापि, अशा विद्यार्थ्यांना त्यांचे टेस्ट/टर्म वर्क इत्यादी नियमित सत्रात पूर्ण करणे बंधनकारक राहील.

५) जे विद्यार्थी थेअरी परीक्षेत उत्तीर्ण आहेत, परंतु अंतर्गत परीक्षेमुळे अनुत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांसाठी संबंधित महाविद्यालयाने अंतर्गत गुणांसाठी इम्प्रूव्हमेंट टेस्ट घेऊन अंतर्गत गुण हे इतर विद्यार्थ्यांच्या हिवाळी २०१६च्या परीक्षेच्या गुणांसोबतच विद्यापीठात सादर करावेत. सदरील इम्प्रूव्हमेंट परीक्षा एक विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

६) **बी. फार्म सी.जी.पी.ए. नवीन अभ्यासक्रमासाठी वरील सवलत लागू होणार नाही.**

***मुद्दा क्र.१ आणि २ साठी संबंधित दोन्ही वर्षांचे २५ टक्के विषय मोजताना थेअरी व प्रॅक्टीकल्स एकत्रित संख्येने मोजण्यात येतील.**

**उदा. अंतिम वर्षात प्रवेश देण्यात येताना—**

I प्रथम वर्ष — थेअरी—८ प्रॅक्टीकल—६
II द्वितीय वर्ष — थेअरी—८ प्रॅक्टीकल—५

**एकूण = २७**
**२५ टक्के ६.७५ = ७**

**उदा. तृतीय वर्षात प्रवेश देण्यात येताना—**

III द्वितीय वर्ष — थेअरी—८ प्रॅक्टीकल—५
IV तृतीय वर्ष — थेअरी—८ प्रॅक्टीकल—६

**एकूण = २७**
**२५ टक्के = ६.७५ = ७**